# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

## नवउद्योजक व्यावसायिक कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## - नवउद्योजक व्यावसायिक कर्ज धोरण -

**४१/१ ली संचालक मंडळ सभा**
**दिनांक ०२/०५/२०१६ चे ठराव क्रमांका ३८ नुसार मंजूर**

**१. उद्देश -** खाद्यगृह व्यवसायिकांच्या गरजा भागविणे / नविन व्यवसाय सुरू करणेसाठी.
**२. पात्रता / निकष -**

१) अर्जदार कंपनीने, कराराव्दारे, नेमणूक केलेला फ्रान्चाईज असणे आवश्यक राहील. फ्रॅन्चाईशी निवड समितीमध्ये कंपनी तसेच बँकेच्या प्रतिनिधीचा समावेश राहील.

२) बँकेच्या कार्यक्षेत्रात कायम वास्तव्य असलेले व बँकेचे नाममात्र सभासद असलेली व्यक्ती, बेरोजगार, उद्यमशील बचत गट, महिला मंडळ या सारख्या स्वयंरोजगार व्यवसाय सुरू करणाऱ्या व्यक्ती/ व्यक्तीसमूह यांनी सादर केलेले प्रकल्प अहवाल तांत्रिक दृष्टया सिध्द/ साध्य व आर्थिक दृष्टया किफायतशिर असणे आवश्यक राहील.

३) रिझर्व्ह बँक व नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनानुसार पात्र अर्जदाराची नियोजीत प्रकल्पातील स्वः गुंतवणूक एकूण प्रकल्प खर्चाच्या २५% असणे आवश्यक आहे.

४) अर्जदाराने संबंधित कंपनीकडून, सदर व्यवसायासंबंधीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

५) बँकेच्या कार्यक्षेत्रातील तसेच स्थानिक उपनगरीय सेवा उपलब्ध असलेल्या शहरी विभागातील चालू व नियोजित प्रकल्प कर्ज मंजूरीस पात्र राहतील.

६) सदरचा उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रचलित कायद्यानुसार आवश्यक असलेले परवाने, नोंदणी दाखले, ना हरकत प्रमाणपत्र इ. सादर करणे आवश्यक आहे.

७) सदरील व्यवसायासाठी निवडण्यात आलेली जागा स्वमालकीची, अथवा ५ ते ७ वर्षासाठी भाडे करारावर घेतलेली असावी. सदर जागा व्यवसायास सोयीस्कर असणे आवश्यक असून सदर जागेचे दस्तऐवज व अनुषंगिक कागदपत्रे प्रकल्प अहवालासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८) पागडी पध्दतीने जागा असल्यास जागा मालकाचे संमती पत्रक सादर करणे आवश्यक राहील.

९) कर्जास दोन सक्षम जामिनदार देणे आवश्यक राहील.

**कर्ज मर्यादा -**

अर्जदाराची परतफेड क्षमता तपासून, प्रकल्प मुल्यमापन व छाननी अहवालानुसार प्रकल्प खर्चाचे ७५% किंवा कमाल रू.१२.०० लाख इतके कर्ज मंजूर केले जाईल.

**परतफेड कालावधी -**
५ ते ७ वर्षे
(६ महिने मोरॅटरीयम कालावधीसह)

**व्याजदर -** द.सा.द.शे.१३% (दरमहा व्याज आकारणी केली जाईल)

**कर्ज वितरण -** प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेल्या २५% स्वभांडवलाची उभारणी केल्यानंतरच, मंजूर कर्ज रक्कमेचे वितरण अर्जदाराचे मागणीनुसार व बँकेने नियुक्त केलेल्या तज्ञ सल्लागाराचे अहवालानुसार साहित्य साधने पुरवठादारास थेट करण्यात येईल.

**कर्जदस्तऐवज -**

१. वचनचिठ्ठी

२. सातत्य हमी पत्र.

३. कर्ज करारनामा.

४. लेटर ऑफ लीन / सेट ऑफ

५. जामीनदारांचा करारनामा.

६. डेबीट ॲथॉरीटी व मंजूर कर्ज, अटी शर्ती, मान्य असलेसंबंधी ठराव व पत्र.

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे -**

१. विहीत नमुन्यातील कर्ज मागणी अर्ज.

२. प्रकल्प अहवाल (प्रोजेक्ट रिपोर्ट) दोन प्रती (तज्ञ सल्लागार अथवा सनदी लेखापाल यांनी तयार केलेला)

३. अर्जदार व जामिनदारांचे के.वाय.सी., नाममात्र सभासदत्वाचा अर्ज.,

४. Franchisee साठी, कंपनी बरोबर केलेल्या कराराची प्रत.

५. युनीटसाठी लागणाऱ्या जागेसंबंधी खरेदीखत / भाडेकरारपत्र

६. व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व्यक्तींची, सर्व माहिती व निधी उभारण्याबाबत स्त्रोतांची माहिती.

७. गुमास्ता लायसन्स, टॅक्स रजिस्ट्रेशन, इन्कम टॅक्स रिटर्नस.

८. **प्रकल्प** आर्थिक दृष्टया किफायतशीर असलेसंबंधी अहवाल.

**सर्वसाधारण नियम व अटी -**

१. अर्जदार व जामिनदार यांनी बँकेचे नाममात्र सभासदत्व घेणे आवश्यक असून त्यांचे, या बँकेत बचत ठेव / मुदत ठेव खाते असणे आवश्यक आहे.

२. कंपनीने प्रत्येक Franchisee साठी बँकेकडे कर्ज कालावधी पर्यंत रू.५००००/- इतकी अनामत बँकेकडे ठेवणे आवश्यक राहील.

३. कंपनीने प्रमाणित केलेल्या आवश्यकतेप्रमाणे युनीट इंटेरीअर करणे आवश्यक राहील.

४. व्यवसायाचे जागेच्या ठिकाणी "मुंबै बँकेकडून अर्थसहाय्य" असा फलक प्रदर्शनी भागावर लावला पाहिजे.

५. दैनंदिन व्यवहाराबाबतची माहिती सादर करून जमा रक्कमेचा भरणा मुंबै बँकेच्या शाखेतील बचत/चालु खाती जमा करावा लागेल.

६. प्रकल्प खर्चाच्या ७५% रक्कम बँक कर्जाव्दारे उपलब्ध करून दिली जाईल.

७. बँक कर्जाची रक्कम प्रकल्प उभारणीचे प्रगतीनुसार, बँक नियुक्त तज्ञ सल्लागार यांचे पहाणी / छाननीनंतर अदा केली जाईल. मशिनरी व साधन / सामुग्री खरेदीसाठी रक्कम परस्पर विक्रेत्यास अदा केली जाईल.

८. कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे.१३% राहील त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार बँकेस राहिल. कर्ज थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर २% दंडव्याज आकारले जाईल. कर्ज परतफेड ८४ मासिक हप्त्यात दरमहा व्याज रकमेसह २० तारखेस करावयाची आहे.

९. कर्ज रक्कमेची संपूर्ण परतफेड होईपर्यंत, स्वभांडवलाचे रक्कमेत, घट करता येणार नाही. कर्ज रक्कमेचा विनीयोग केवळ व्यवसायिक गरजा भागविण्यासाठी करावयाचा आहे. तसेच सर्व आर्थिक व्यवहार या बँकेच्या खात्यावर करणे आवश्यक आहे.

१०. कोणत्याही अटीत पूर्व सूचनेशिवाय बदल करण्याचा व अटी रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

११. कर्ज परतफेडीची प्राथमिक जबाबदारी त्याचबरोबर तेवढीच जबाबदारी कर्जदार व जामिनदारावर संयुक्त व वैयक्तिकरित्या राहिल व ती त्यांच्या वारसावरही राहिल. त्यांच्यापैकी कोणीही एका अगर अधिक व्यक्तीकडून कर्जाची वसुली करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

१२. बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय कर्जदारास अन्य कोणत्याही बँकेकडून व अन्य संस्थेकडून कर्ज घेता येणार नाही.

१३. बँक कर्ज रक्कमेतून निर्माण होणाऱ्या चल/अचल संपत्तीवर बँकेचा बोजा निर्माण करावा लागेल व सदर मालमत्ता नजरगहाण खताद्वारे तारण घेण्यात येईल.

१४. खादयगृहात नियुक्त करावयाच्या सेवकांची नियुक्ती, वेतन इत्यादींची जबाबदारी संबंधीत फ्रॅन्चाईज यांची राहील.

Z:\Vaishu\karj dhoran 2016\nav uduyojak vyvsaik karj dhoran.doc